# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८९** **दिनांक १४/०७/२०२१**

## घरफोडी चोरी करणा-या तीन आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडून ४ घरफोडीचे गुन्हे उघडकीस- तुळींज पोलीस स्टेशनची कामगिरी.

तक्रारदार श्री. दिनेश शोभाराम चौधरी, वय २६ वर्ष, व्यवसाय भांड्याचे दुकान, रा. हिल व्ह्यू अपार्टमेन्ट, रुम नं.१०५, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांनी तक्रार दिली की, दिनांक ०८/०७/२०२१ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता ते दिनांक ०९/०७/२०२१ रोजी सकाळी ०८.०० वा. चे दरम्यान त्यांचे सुविधा स्टील सेंटर, शॉप नं. ०१, जय गणेश शॉपींग सेंटर, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व येथील दुकानाचा मागील दरवाजा कुणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचेतरी साहयाने तोडून दुकानात प्रवेश करुन दुकानातील एकूण ८०,४८४/- रुपये किंमतीचे भांडी, इस्त्री, कुकर, गॅस शेगडी इत्यादी माल चोरी करुन नेले बाबतची तक्रार दिल्याने तुळींज पोलीस ठाणे येथे दिनांक ०९/०७/२०२१ रोजी गुन्हा रजि नं. I ६८०/२०२१ भादंविस. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्वरीत घटनास्थळाची पाहणी करुन गुप्त बातमीदार यांना माहीती दिली. तसेच पोलीस शिपाई अश्पाक जामदार यांनी तांत्रीक बाबींचा कौशल्याने वापर करुन सदर गुन्हयातील दोन पुरुष व एक महीला आरोपीत १) व्यकटेश रामस्वामी कौडल वय ४२ वर्षे रा. रुम नंबर ५, काली माताजी चाळ, गालानगर नालासोपारा पुर्व ता. वसई मुळ रा. मनीकल पोस्ट पुलेआम भटटी, ता. चंगम जि. तिरुवनामय राज्य तामीळनाडू. २) पार्वती व्यकटेश कौडल वय ३६ वर्षे, रा. रुम नंबर ५, कालीमामाताजी चाळ, गालानगर नालासोपारा पुर्व ता. वसई मुळ रा. मनीकल पोस्ट पुलेआम भटटी, ता. चंगम जि. तिरुवनामय राज्य तामीळनाडू ३) मुरुगेश पन्नीरसेलवम कौडल वय ४० वर्षे रा. रुम नंबर ३१६, साईबाबा गल्ली, गालानगर नोलासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर. मुळ रा. मनीकल पोस्ट पुलेआम भटटी, ता. चंगम जि. तिरुवनामय राज्य तामीळनाडू यांचा माग काढून त्यांना शितापीने ताब्यात घेऊन त्यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला ४०,५९५/- रु किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच सदर आरोपीतांकडून अशाच प्रकारचे खालीलप्रमाणे अजुन तीन गुन्हे उघडकीस आणण्यास गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे.

| अ.क्र | गुन्हा रजि.नंबर | मिळाला माल |
|---|---|---|
| १. | तुळींज पोलीस स्टेशन I ७५१/२०२१ भा.दं.वि.सं कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. | १) ३,०००/- रुपये कंपनीचे एक लुमीनस कंपनीचे इन्व्हरटर मशिन कि.सु.<br>२) १०,०००/- रुपये किमतीची ॲक्टीवा कंपनीची बॅटरी जुवाकिं.सु.<br>३) १०,०००/- रुपये किमतीचे डेल कंपनीचे कॉम्पयूटर कि.सु<br>४) ५,०००/- रुपये किमतीचा इलेक्ट्रीक वजन काटा कि.सु.<br>५) ९०००/- रुपये किमतीचे १५ कि.लो. बदाम बंद पाकीट ६००/- रुपये पर किलो.<br>६) ६६५०/- रुपये किमतीचे ९.५ किलो काजू बंद पाकीट ७००- रुपये पर किलो. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) ३८९५/- रुपये किमतीचे फेवरेट कंपनीचे खादयतेल १९ लिटर प्रत्येकी एक लिटर चे त्यावर २०५/- रुपये किंमत असलेले.<br>८) ४,०४५/- रुपये किमतीचे राजधानी कंपनीचे खादयतेल २१ लिटर प्रत्येकी एक लिटर चे त्यावर २०५/- रुपये किंमत असलेले.<br>९) १,७१०/- रुपये किमतीचे गुडमॉनीग कंपनीचे खादयतेल ९ लिटर प्रत्येकी एक लिटर चे त्यावर १९०/- रुपये किमत असलेले.<br>१०) ५,०००/- रुपये किमतीचे १० किलो तांदुळ ५०/- रुपये पर किलो.<br>११) १८०/- एक पँकेट काळा खजुर<br>१२) २१५/- एक पॅकेट बासमती तांदुळ<br>-------------- एकूण<br>४८,६९५/- |
| २. | तुळींज पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर I ३८९/२०२१ भादविसक ३७९ प्रमाणे. | १) १,०००/- रुपये किमतीच्या दोन खुर्च्या एका खुर्चीची किमंत ५००/- रुपये कि.सू. |
| ३. | तुळींज पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर I ३५२/२०२१ भादविसक ४५४,३८० प्रमाणे. | १) ५,०००/- रुपये किमतीचा रेड मी नोट -७,प्रो कंपनीचा मोबाईल कि.सु. |
| | | १,२१,४९०/- रु एकूण मिळाला माल |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ -२, श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. संदेश पालांडे, सपोनि. मिथून म्हात्रे, पोउपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहा.पो.उप.निरी. बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, पो.हवा. अनिल शिंदे, पो.ना. आनंद मोरे, उमेश वरठा, पो.शि. अश्पाक जमादार, छपरीबन यांनी केलेली आहे.

--------ooooo-------